स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION**

**Phone: (02462) 229542** **Website: www.srtmun.ac.in** **E-mail: bos.srtmun@gmail.com**
**Fax : (02462) 229574**

# :: परिपत्रक ::

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील अभियांत्रिकी विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६–१७ करिता तात्पुरत्या प्रवशाबाबत **(Provisional Admission)** नियमावली लागू केली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

परिपत्रक प्रस्तुत विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी, सर्व संबंधितानी याची नोंद घ्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर, )(
विष्णुपुरी, नांदेड. )( स्वाक्षरित/–
जा.क्र.: शैक्षणिक/०१/अभियांत्रिकी/ता. प्रवेशाबाबत/ )( **संचालक**
२०१६–१७/१२०० )( महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
दिनांक : १४.०९.२०१६. )(

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
:
१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. परीक्षा नियंत्रक यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) मा. प्राचर्या, संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) साहाय्यक कुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सिस्टम एक्स्पर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## संदर्भ परिपत्रक क्र. १२०० दि.१४/०९/२०१६
## अभियांत्रिकी विद्याशाखेतील (Old/Rev/New) अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या तात्पुरत्या प्रवेशाबाबत

*१) जे परीक्षार्थी प्रथम व द्वितीय वर्षातील (FE & SE) एकत्रित एकूण विषयांपैकी २५ टक्के विषयांमध्ये अनुत्तीर्ण असतील, ते तृतीय वर्षात तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेण्यास पात्र राहतील.

२) जे परीक्षार्थी द्वितीय व तृतीय (SE & TE) वर्षातील एकत्रित एकूण विषयांपैकी २५ टक्के विषयात अनुत्तीर्ण असतील, ते अंतिम वर्षात तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेण्यास पात्र राहतील.

३) उपरोक्त अ.क्र.१ व २ प्रमाणे ज्यांनी तात्पुरता प्रवेश घेतलेला असेल, ते उन्हाळी २०१६ परीक्षेच्या मागील वर्गाच्या (प्रथम व द्वितीय वर्ष) पुनर्मूल्यांकनात उत्तीर्ण झाल्यास ते विद्यार्थी अनुक्रमे तृतीय वर्ष व अंतिम वर्षाकरिता प्रवेशास पात्र ठरल्यास, त्यांचे तात्पुरते प्रवेश कायम करून त्यांना हिवाळी २०१६ मध्ये अनुक्रमे तृतीय सत्र व अंतिम वर्षाच्या प्रथम सत्राची विद्यापीठ परीक्षा देता येईल.

४) जर तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी उन्हाळी–२०१६ च्या पुनर्मूल्यांकनामध्ये उत्तीर्ण झाले नाहीत, तर अशा विद्यार्थ्यांनी हिवाळी–२०१६ च्या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण राहिलेले विषय उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल व त्यांना उन्हाळी–२०१७ मध्ये होणाऱ्या परीक्षेत दोन्ही सत्रांची एकत्रित परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येईल. तथापि, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे टेस्ट/टर्म वर्क इत्यादी नियमित सत्रात (उपस्थितीच्या अटीसह) पूर्ण करावे लागेल.

५) जरी तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी हे त्या–त्या नियमित सत्राची (तृतीय किंवा अंतिम वर्षाच्या) परीक्षा देण्यास पात्र असणार नसतील तरीही पहिल्या सत्रात प्रचलित नियमानुसार उत्तीर्ण झाल्यास द्वितीय सत्रात त्यांना त्या वर्षाचे पूर्ण विषय घेऊन परीक्षेस बसता येईल. अनुत्तीर्ण झाल्यास त्यांना फक्त Term Complete करता येईल व त्यांनतर प्रचलित नियमानुसार उत्तीर्ण झाल्यावरच ते प्रवेशित वर्षाची परीक्षा देण्यास पात्र राहतील.

६) उर्वरित अनुत्तीर्ण विद्यार्थी उन्हाळी २०१६ च्या पुनर्मूल्यांकनात तात्पुरत्या प्रवेशास पात्र ठरण्याच्या अटीवर हमीपत्र देऊन संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या परवानगीने वर्गात उपस्थित राहतील. हे विद्यार्थी उन्हाळी–२०१६ च्या पुनर्मूल्यांकनात उत्तीर्ण न झाल्यास त्यांना नंतर ते उत्तीर्ण झाल्यावरच त्या वर्षात नियमित प्रवेश घेता येईल.

७) जे विद्यार्थी सैद्धांतिक (थेअरी) परीक्षेत उत्तीर्ण ($\geq$32/80) असतील; परंतु अंतर्गत Test मध्ये अनुत्तीर्ण होतील, फक्त अशा विद्यार्थ्यांच्या संबंधित महाविद्यालयाने १५ दिवसांच्या आत इम्प्रूव्हमेंट टेस्ट घेऊन अंतर्गत गुण विद्यापीठात (परीक्षा विभागात) सादर करावेत व त्यानुसार निकाल दुरुस्त करून देण्यात यईल. अशी संधी केवळ एक वेळेस चालू शैक्षणिक वर्षातील त्या–त्या सत्रात देण्यात येईल.

***मुद्दा क्र.१ आणि २ साठी संबंधित दोन्ही वर्षांचे २५ टक्के विषय मोजताना थेअरी व प्रॅक्टीकल्स एकत्रित संख्येने मोजण्यात येतील.**

**उदा. अंतिम वर्षात प्रवेश देण्यात येताना–**

प्रथम वर्ष – थेअरी–१० प्रॅक्टीकल–०

द्वितीय वर्ष – थेअरी–१० प्रॅक्टीकल–६

**एकूण = २६**

**२५ टक्के ६.५ = ७**

**उदा. तृतीय वर्षात प्रवेश देण्यात येताना–**

द्वितीय वर्ष – थेअरी–१० प्रॅक्टीकल–६

तृतीय वर्ष – थेअरी–१० प्रॅक्टीकल–६

**एकूण = ३२**

**२५ टक्के = ८**

* * * * *